# सहशालेय उपक्रम

## १.ग्रंथप्रदर्शन




**ग्रंथ प्रदर्शन सहशाले उपक्रम ज्ञानसंपादनाचे ज्ञान संपादनाच्या अनेक दारी आहेत त्यापैकी वाचनिक महत्वाचे आहे जो वाचेल तो वाचेल या व्यक्तीला अनुसरून विद्यार्थ्यांना साहित्य बदलून वाचनाबद्दल आवड निर्माण व्हावी या हेतूने विद्यालयांमध्ये दरवर्षी ऑगस्ट महिन्यामध्ये ग्रंथ प्रदूषण भरवली जाते ग्रंथ प्रदर्शनास परिसरातील भेट देतात ग्रंथ प्रदर्शनामुळे विविध पुस्तके त्यांचे लेखक पुस्तकातील असे प्रकाशन यांची माहिती विद्यार्थ्यांना पालकांना मिळावी म्हणून या ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले जाते विद्यार्थी या ग्रंथ प्रदर्शनामध्ये उत्साहाने भाग घेतात विद्यालयामध्ये एकूण ग्रंथ संख्या ४१००  एवढी आहे विद्यालयातील विद्यार्थी दररोज दुपारी तीन ते साडेतीन वेळात ग्रंथाचे व पुस्तकांची वाचन करतात विद्यार्थी आपल्या वाढदिवसा दिवशी ग्रंथालयास पुस्तक भेट स्वरूपात देतात.**

## 2.महिला मेळावा व हळदी कुंकू समारंभ





महिला मेळावा हळदीकुंकू समारंभ आंतरराष्ट्रीय महिला दिन दरवर्षी ०८ मार्च रोजी विद्यालयामध्ये साजरा केला जातो .महिला हक्क चळवळीचा केंद्रबिंदू मानून हा दिवस पाळला जातो. कार्यक्रमामध्ये परिसरातील सर्व महिलांना विद्यालयामध्ये आमंत्रित केले जाते त्यांना आपले आरोग्य ,आहार, व्यायाम इत्यादी बाबत माहिती दिली जाते. महिलांना विद्यालयामध्ये महिलांच्या मनोरंजनासाठी काही खेळ स्पर्धा घेतल्या जातात. महिलांना अभिव्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. महिलांमध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वाव दिला जातो.

## 3.पाककला प्रदर्शन





पाककला म्हणजेच चविष्ट रुचकर आणि पोषक भोजन. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये आहाराचे महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना पोषक आहाराची माहिती व्हावी यासाठी पाककला प्रदर्शन व त्यांचे व्यवहार ज्ञान  विकसित करण्यासाठी व खाद्यपदार्थ विक्री या उपक्रमाचे आयोजन विद्यालयामध्ये केले जाते. या उपक्रमामध्ये विद्यार्थी सहभागी होऊन स्वत: तयार केलेले  पौष्टिक पदार्थ प्रदर्शनात  मांडतात. खाद्यपदार्थ विक्रीसाठी मांडले जातात.या उपक्रमास विद्यालयातील परिसरात विद्यालयाच्या परिसरातील गावांमधून पालक भेट देतात.



# शालेय भित्तिपत्रक प्रदर्शन

वाचाल तर वाचाल या उक्तीनुसार मुलांच्या मध्ये वाचनाची आवड निर्माण करणे या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी शाळेमध्ये भित्तीपत्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमाने विद्यार्थ्यांची कला कौशल्य विकसित होण्यास मदत होते.

## 4.विज्ञान प्रदर्शन SCIENCE EXHIBITION





२८ फेब्रुवारी विज्ञान दिनाचे  औचित्य साधून विद्यालयामध्ये सायन्स एक्झिबिशनचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. या शैक्षणिक साहित्य निर्मिती प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांमधील सृजनशीलतेला त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळतो यामध्ये इयत्ता पाचवी ते दहावी मधील विद्यार्थी स्वत:ची  उपकरणे शैक्षणिक साहित्य स्वतः तयार करून आणतात. विद्यालयाच्या पटांगणावर त्याचे आकर्षक मांडणी करून पाचवी ते सातवी लहान गट व आठवी ते दहावी मोठा गट अशा स्वरूपात स्पर्धेचे आयोजन केले जाते. विभाग वार्ड क्रमांक काढून त्या विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या वतीने बक्षीस व सन्मान चिन्ह भेट देऊन कौतुक केले जाते या प्रदर्शनास परिसरातील अनेक नागरिक भेट देतात या स्पर्धेतून भविष्यात विद्यार्थ्यांमध्ये एक शास्त्रज्ञ निर्माण व्हावा या हेतूने उपक्रम आयोजित केला जातो.

## ५.वर्ग सुशोभन व स्वयंशासन दिन

विद्यालयामध्ये सुशोभन व स्वयंशासन दिन उत्साहात  साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे एक दिवसाचे विद्यार्थ्यांनी शिक्षक बनणे व त्यांना  शिक्षकांच्या कार्याची जाणीव होणे होय. तसेच विद्यार्थ्यांना स्वयंशिस्तिची जाणीव  व्हावी व विद्यार्थ्यांना अध्यापनाचा अनुभव यावा यासाठी हा दिवस विद्यालयामध्ये साजरा केला जातो. एक दिवस मुख्याध्यापक, शिक्षक व शिपायांची जबाबदारी पार पडताना विद्यार्थ्यांना आलेले अनुभव ते आपल्या मनोगतातून व्यक्त करतात. वर्ग सुशोभन उपक्रमात विद्यार्थ्यांना टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू कशा बनवतात याचा उपयोग अनुभव घेता आला. स्वतः तयार केल्या वस्तूंची वर्गात योग्य मांडणी केली तर सर्व वर्ग सजवल्यामुळे स्वयं आनंद मिळतो स्वकर्तुत्वाची जाणीव विद्यार्थ्यामध्ये निर्माण होते.

# 6.वृक्षारोपण





पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या उद्देशाने विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून दरवर्षी पंतोजी मळा, गणेश मंदिर परिसर तसेच घारेवाडी धुळोबा डोंगर परिसर येथे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केले जाते. विद्यार्थी उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये बियांची संकलन करून त्याचे चेंडू म्हणजेच सिडबॉल बनवतात आणि हवामानानुसार  वृक्ष लागवड करतात. वृक्षारोपण ही केवळ पर्यावरणासाठीच नाही तर मानवाच्या जीवनासाठी आवश्यक आहे पर्यावरणाचा पर्यावरण सुरक्षित सुरक्षेचा संदेश देऊन आपण पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे हा विद्यार्थ्यांना संदेश दिला जातो.




# मोफत पाठ्यपुस्तके वितरण

शालेय मोफत पाठ्यपुस्तक वितरण योजना महाराष्ट्र शासनामार्फत पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यासाठी राबविण्यात येते या योजनेअंतर्गत विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके शाळेच्या संचालिका डॉक्टर स्वाती थोरात मॅडम व विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पाटील सर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना देण्यात आली



# प्रतापगड सहल

**प्रतापगड सहलीसाठी एक उत्तम ठिकाण आहे विद्यार्थ्यांना आपल्या ऐतिहासिक वारसा असलेल्या किल्ल्यांची माहिती व्हावी ,यासाठी प्रतापगड सहलीचे आयोजन केले. हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी 1656 मध्ये बांधला होता, आणि अफजलखान व छत्रपती शिवाजी महाराजांमधील लढाईचे ठिकाण म्हणून हा किल्ला प्रसिद्ध आहे.**



# दिल्ली लाल किल्ला सहल

विद्यार्थ्यांना पर्यटनाच्या माध्यमातून ऐतिहासिक वारसा असलेल्या दिल्लीच्या लाल किल्ल्याची ओळख व्हावी या दृष्टीने विद्यालयाची इयत्ता सातवी ते नववी या वर्गाची शैक्षणिक सहल आयोजित केली शैक्षणिक सहलीसाठी दिल्लीतील लाल किल्ला एक उत्तम ठिकाण आहे लाल किल्ला दिल्लीतील एक महत्त्वाचा ऐतिहासिक किल्ला आहे. हा किल्ला लाल रंगाच्या दगडांनी बांधलेला असल्यामुळे लाल किल्ला म्हणून ओळखला जातो